गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष २ रे ● अंक ९५ वा ● गुरुवार २२ ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 95 | Date : 22/08/2024 | blow Thursday | Page 4 Price 4

# आता राज्यात 'लाडका शेतकरी अभियान' : मुख्यमंत्री शिंदे

**दैनिक यशसिद्धी न्युज**

बीड : लाडकी बहीण व लाडका भाऊ नंतर आता आपला अन्नदाता असणाऱ्या शेतकऱ्याच्या लाभाच्या सर्व योजना राबवून लाडका शेतकरी अभियान राज्यात सुरु करण्यासोबतच सोयाबीन व कापसाला हेक्टरी पाच हजार रुपये मदत देण्यातील ई पिक पाहणीची अट रद्द करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज परळी वैजनाथ येथील राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी केली.

परळी येथील स्व. पंडीतअण्णा मुंडे सभामंडप कृषि उत्पन्न बाजार समिती येथे एका दिमाखदार सोहळ्यात पाच दिवसीय कृषि महोत्सव २०२४ चे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमास व्यासपीठावर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे, राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल तसेच विधानपरिषद सदस्या आमदार पंकजा मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते रिमोटद्वारे नमो शेतकरी महासन्मान योजनेचा चौथा हप्ता राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात डीबीटीद्वारे जमा करण्यात आला. तसेच सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पाच हजार रुपये अनुदान वितरीत करण्यासाठी वेबपोर्टलही मान्यवरांच्या हस्ते कार्यान्वित करण्यात आले. कृषि विभागाच्या विविध योजनांच्या माहितीचा समावेश असलेल्या कॉफी



टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. यासोबतच परभणी येथील वसंतराव नाईक कृषि विद्यापीठाने तयार केलेल्या एकात्मिक कीड रोग व्यवस्थापन पुस्तिकेचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले.

पाच दिवसीय या कृषि महोत्सवात कृषि साहित्य प्रदर्शनासोबतच पशुप्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत येणाऱ्या पाच दिवसात विविध विषयांवर परिसंवाद, चर्चासत्र होणार आहे. तसेच याठिकाणी धान्य महोत्सव, रानभाजी महोत्सव होणार आहे. प्रदर्शनात महिला बचतगटांसाठी साहित्य विक्रीची दालने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. कृषि अवजारांचा स्वतंत्र विभाग देखील याठिकाणी आहे. या पाच दिवसीय महोत्सवाला किमान पाच लाख शेतकरी भेट देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

राज्यातील सरकार हे शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणारे असून आतापर्यंत नैसर्गिक आपत्तीच्या काळात हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे. एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून दुप्पट नुकसानभरपाई देण्याचा निर्णय शासनाने घेतला. गतवर्षी सोयाबीन, कापूस पिकाला कमी दर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी पाच हजार रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला. यासाठी आवश्यक ई-पीक पाहणी अहवाल अनेक शेतकऱ्यांकडे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले असल्याने आता ई-पीक पाहणी अहवालाची अट शिथिल करून सातबारा उताऱ्यावरील नोंदीनुसार अनुदान वाटप करण्यात येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यासोबतच लाडक्या भावांना विद्यावेतन देण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणली. आता याच धर्तीवर विविध लाभांच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लाडका शेतकरी अभियान सुरु करण्याची घोषणा मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केली. याची सुरुवात आज नमो शेतकरी महासन्मान योजनेचा दोन हजार रुपयांचा चौथा हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करून होत । **पान २ वर**

## आंध्र प्रदेशातील एका फार्मा कंपनीत भीषण स्फोट; १५ जणांचा मृत्यू, ४० जण गंभीर जखमी

**दैनिक यशसिद्धी न्युज**




आंध्रा : आंध्र प्रदेशमधील अनकापल्ले जिल्ह्यामध्ये असलेल्या एका फार्मा कंपनीमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. फार्मा कंपनीतील एका युनिटमध्ये मोठा स्फोटा झाल्याची घटना घडली. यामध्ये १५ जणांचा मृत्यू झाला असून ४० पेक्षा जास्त जण गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान, या घटनेत जखमी झालेल्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक घटनास्थळी दाखल झाले होते.

इंडिया टुडेच्या वृत्तानुसार, आंध्र प्रदेशातील अनकापल्ले जिल्ह्यातील एस्सियंटिया या फार्मास्युटिकल कंपनीत बुधवारी दुपारी भीषण स्फोट होऊन १५ जणांचा मृत्यू झाला. तर ४० पेक्षा जास्त जण गंभीर जखमी झाले आहेत. दुपारच्या जेवणावेळी कंपनीतील काही कामगार जेवणासाठी बाहेर गेले होते. मात्र, यावेळी ही घटना घडली. जेवणासाठी अनेक कामगार बाहेर गेल्यामुळे अनेकांचा जीव बचावला आहे.दरम्यान, ही घटना घडल्यानंतर घटनास्थळावर तात्काळ रुग्णवाहिका दाखल होत जखमी झालेल्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. जखमी झालेल्या कामगारांवर उपचार सुरु असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. फार्मा कंपनीत भीषण स्फोटाची घटना घडल्यानंतर कंपनीच्या परिसरात राखाडी धुराचे मोठमोठे लोट पसरले होते.या घटनेनंतर स्थानिक प्रशासनाकडून मदत आणि बचावकार्य सुरू आहे. दरम्यान, एस्सियंटिया या फार्मास्युटिकल कंपनीत आधी भीषण स्फोट झाला आणि त्यानंतर मोठ्या प्रमाणात आग लागली. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये घबराट पसरली होती. तसेच आपला जीव वाचवण्यासाठी कामगारांनी कंपनीच्या बाहेर धाव घेत आपला जीव वाचवला. सध्या कंपनीला लागलेली आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. तसेच अग्निशमन दलाचे जवान आणि पोलिसांकडून मदत कार्य सुरु असून कंपनीत अडकलेल्या कामगारांची सुटका करण्यात येत आहे.

## 'भारत बंद'दरम्यान बिहारमध्ये लाठीमार, आंदोलकांचा रेल रोको; देशभरात संमिश्र प्रतिसाद

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पाटणाः सर्वोच्च न्यायालयाच्या अनुसूचित जाती आणि जमातीच्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात दलित आणि आदिवासी संघटनांनी बुधवारी 'भारत बंद'ची हाक दिली होती. या बंदला देशभरात संमिश्र प्रतिसाद मिळाला. बिहारमध्ये मात्र आंदोलकांनी दरभंगा आणि बक्सर स्थानकांवर रेल्वेसेवा रोखून धरली. तसेच पाटणा, हाजीपूर, दरभंगा, जेहानाबाद आणि बेगुसराय जिल्ह्यात रस्ते वाहतूकही रोखल्याने पोलिसांनी आंदोलकांना पांगवण्यासाठी लाठीमार केला. यामुळे काही काळ तणावाचे वातावरण होते.अनुसूचित जातीसाठी असलेले आरक्षण देताना त्यात वर्गीकरण करण्याचा अधिकार राज्यांना असल्याचा महत्त्वपूर्ण निकाल



सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट रोजी दिला होता. हा निकाल देताना अनुसूचित जाती हा एकसंध गट नसून त्यातील विविध जातींमध्ये विषमता असल्याचे निरीक्षण सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील सातसदस्यीय घटनापीठाने नोंदविले.सोबतच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींमधील आरक्षणाचा लाभ योग्य घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या वर्गातही 'क्रीमिलेयर' लावण्याची गरज असल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाने दिले. याविरोधात दलित आणि आदिवासींसह २१ संघटनांनी 'भारत बंद'ची हाक दिली होती.बिहारमध्ये मात्र या बंददरम्यान पोलिसांना लाठीमार करावा लागला. पाटण्यातील डाक बंगला चौकात वाहतूक रोखून बॅरिकेड्स तोडणाऱ्या आंदोलकांना पांगवण्यासाठी सुरक्षा कर्मचाऱ्यांनी लाठीमार केला. यात कोणीही जखमी झाले नाही. परिस्थिती नियंत्रणात आहे, असे पाटण्याचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक राजीव मिश्रा यांनी 'पीटीआय'ला सांगितले. जेहनाबाद जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग क्र. ८३ वरील उंटा चौकात आंदोलक आणि सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांमध्ये खडाजंगी उडाली. या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांना ताब्यात घेतले.

## राज्यसभेसाठी भाजपच्या उमेदवारांची यादी जाहीर

**दैनिक यशसिद्धी न्युज**

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीनंतर आता राज्यसभा पोटनिवडणुकीचे बिगुल वाजले असून राज्यसभेच्या १२ जागांसाठी ३ सप्टेंबरला निवडणूक होणार आहे. यादरम्यान, मागील अनेक दिवसांपासून भाजपचे नेते आणि माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब दानवे यांची राज्यसभेवर वर्णी लागणार असल्याची चर्चा होती. मात्र, भाजपने नेहमीप्रमाणे धक्कातंत्र वापरत या जागेवर धैर्यशील पाटील यांना संधी दिली. भाजपने राज्यसभेसाठी आसाममधून मिशन रंजन दास आणि रामेश्वर तेली, बिहारमधून मनन कुमार मिश्र, हरियाणातून किरण चौधरी, मध्य प्रदेशमधून जॉर्ज कुरियन, महाराष्ट्रातून धैर्यशील पाटील, ओडिशामधून ममता मोहंता, राजस्थानातून सरदार रवनीतसिंह बिट्टू, त्रिपुरामधून राजीव भट्टाचार्य यांची नावे जाहीर केली आहेत. ९ राज्यांमधील १२ रिक्त जागांसाठी ही पोटनिवडणूक होणार आहे. या रिक्त जागांमध्ये महाराष्ट्रातील २ जागांचा समावेश आहे. यापैकी आता धैर्यशील पाटील यांच्या नावाची घोषणा केल्यामुळे उर्वरित एका जागेवर कोणाची वर्णी लागणार याबाबतची उत्सुकता लागली आहे.

## मंकीपॉक्स आजाराचे टेन्शन वाढवलं

मुंबई/वृत्तसंस्था : जगभरात खळबळ माजवणाऱ्या मंकीपॉक्स आजाराने आता भारतातही धास्ती वाढवली. विशेष महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहरात मंकीपॉक्स आजाराता धोका पाहता प्रशासनाकडून काळजी घेतली जात आहे. मंकीपॉक्सच्या पार्श्र्वभूमीवर नागपुरातील नागपूर मेडिकल कॉलेज आणि इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज या दोन्ही रुग्णालयात बेड आरक्षित ठेवण्यात आले आहेत.

## आपले सरकार पोर्टल २.० द्वारे नागरिकांच्या तक्रारींचा वेळेत निपटारा करावा : देवांग दवे

**दैनिक यशसिद्धी न्युज**

सोलापूर/प्रतिनिधीः नागरिक आणि प्रशासन यांना ऑनलाईन संवाद साधण्यासाठी सेतू निर्माण करणारा आपले सरकार २.० हा शासनाचा महत्वपुर्ण प्रकल्प आहे. राज्यातील नागरिकांसाठी ऑनलाईन पध्दतीने तक्रार दाखल करता यावी यासाठी आपले सरकार २.० पोर्टल निर्माण करण्यात आले आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी या पोर्टलवर आलेल्या तक्रारींचा निपटारा वेळेत करून दिला पाहिजे, असे आवाहन ई- गव्हर्नसचे तंत्रज्ञ देवांग दवे यांनी केले.

### नियोजन भवन येथे जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागप्रमुखांसाठी आपले सरकार पोर्टल विषयी प्रशिक्षणाचे आयोजन



नियोजन भवन समितीच्या सभागृहात आयोजित आपले सरकार २.० पोर्टल तक्रार निवारण प्रणालीची कार्यपद्धतीबाबत विशेष प्रशिक्षणात श्री. दवे मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहीनकर, महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, पोलिस उपायुक्त विठ्ठल कुबाडे, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, तंत्रज्ञ समीर काळे यांचेसह सर्व संबंधित यंत्रणांना प्रमुख तसेच ऑनलाईन द्वारे उपविभागीय अधिकारी, तहसीलदारही उपस्थित होते.

दवे पुढे म्हणाले की, आपले सरकार २.० पोर्टल माहे जुलै २०२४ मध्ये लाँच झालेले आहे. राज्यातील नागरिकांसाठी ऑनलाईन पध्दतीने तक्रार दाखल करता यावी. तसेच प्रशासनाने ऑनलाईन पध्दतीने अशा तक्रारींचे निवारण करावे यासाठी आपले सरकार २.० ही तक्रार निवारण प्रणाली मंत्रालयीन विभागांबरोबरच राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

सद्य स्थितीत सोलापूर जिल्ह्यात ७ हजार २६५ तक्रारी असून त्यातील ३ हजार ५२ तक्रारीचा निपटारा करण्यात आलेला असून ४ हजार २१३ तक्रारी प्रलंबित आहेत. या सर्व तक्रारी पुढील दोन आठवड्यात सोडवावे असेही त्यांनी सूचित केले.आपले सरकार ही एक क्रांतिकारक ऑनलाईन तक्रार पोर्टल आहे जी सार्वजनिक तक्रारींचे निराकरण करण्याची प्रक्रिया सुलभ करते. पारदर्शक, वापरकर्ता-अनुकूल व्यासपीठ उपलब्ध करून देते. आपल्या । **पान २ वर**

## काँग्रेसचे दिग्गज वकील अतिरेक्याची केस घेतात, १९९३ च्या बॉम्बस्फोटात उज्ज्वल निकम यांची तिखट शब्दांत टीका

**दैनिक यशसिद्धी न्युज**

मुंबई : बदलापूर या ठिकाणी दोन मुलींवर अत्याचार झाला. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. अशात या प्रकरणाची विशेष सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात येईल असं सरकारतर्फे सांगण्यात आलं. ज्यानंतर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी उज्ज्वल निकम यांना हे प्रकरण देऊ नये असं म्हटलं होतं. तसंच संजय राऊत आणि सुषमा अंधारे या दोघांनीही या प्रकरणात उज्ज्वल निकम यांची नियुक्ती नको ते आता भाजपाचे झाले आहेत असं म्हणत टीका केली.



त्यावर आता उज्ज्वल निकम यांनी उत्तर दिलं आहे. उज्जवल निकम यांनी जर हे प्रकरण हाती घेतलं तर पीडितेला न्याय मिळणार नाही असा आरोप विरोधकांनी केला आहे. मात्र विरोधकांच्या आरोपांना निकम यांनी उत्तर दिलं आहे.मी निवडणूक लढलो आहे हे मान्य आहे. राजकीय पक्षाकडून निवडणूक लढलो आहे. काँग्रेसच्या पक्षाचे दिग्गज वकील अतिरेक्यांचं वकीलपत्र घेतात. १९९३ चा खटला मी चालवत होतो, त्यावेळी काँग्रेस पक्षाचे नेते कुणाला वाचवण्यासाठी आटापिटा करत होते, कोणत्या अभिनेत्याला वाचवण्याचा प्रयत्न झाला हे मला आणि महाराष्ट्राला माहीत आहे. माझ्याकडे अशा बऱ्याच गोष्टी आहेत. असं म्हणत उज्ज्वल निकम यांनी विरोधकांना उत्तर दिलं.

बदलापूर आणि पॉक्सो कायद्याबाबत उज्ज्वल निकम म्हणाले की पॉक्सो कायद्याच्या अंतर्गत अधिनियम करावा लागतील. शक्ती विधेयकायचं कायद्यात रुपांतर होणं आवश्यक आहे. माझीच नियुक्ती करण्यात आली त्याचा विरोधकांना त्रास होतो आहे.बदलापूर प्रकरणात जे आंदोलन झालं, तसंच जो रेलरोको । **पान २ वर**

## संपादकीय

### आता राजकीय घडमोडी ..

विधानसभा निवडणुकीसाठी जेमतेम तीन महिन्यांचा कालावधी बाकी असतानाच आणि सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी या निवडणुकीची तयारी केली असतानाच मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण, हा विषय समोर येऊ लागला आहे. सध्या महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी हा विषय जास्त चर्चेत ठेवला आहे. सत्ताधारी महायुतीमध्ये अद्याप या विषयाची चर्चा सुरू झाली नसली, तरी अंतर्गत पातळीवर काही प्रमाणात मात्र निश्चितच कुजबूज सुरू झाली आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी सत्ताधारी महायुतीचा महाराष्ट्रात जोरदार पराभव केल्यामुळे विधानसभा निवडणुकीमध्येही अशाच प्रकारच्या जोरदार यशाची खात्री महाविकास आघाडीच्या नेत्यांना आहे. त्यातूनच हा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण, हा विषय समोर आला आहे. उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत सातत्याने उध्दव ठाकरे हेच महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असतील, असे सांगत आहेत. महाविकास आघाडीतील दोन प्रमुख घटक पक्ष असलेल्या शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्ष यांनी मात्र उध्दव ठाकरे यांचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून अद्याप मान्यता दिलेली नाही. उलट काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अत्यंत स्पष्ट शब्दामध्ये ही मागणी नाकारली आहे. शरद पवार यांनीसुध्दा विधानसभा निवडणूक सामूहिक नेतृत्वाच्या पध्दतीने लढवली जाईल, असे सूतोवाच केले आहे. भाजप सर्वात मोठा पक्ष असला तरी त्यांनी आपल्यापेक्षा छोटा पक्ष असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे मुख्यमंत्रिपद बहाल केले आहे आणि आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये या विषयावरून वाद होण्याची शक्यता कमी आहे. जरी एकीकडे दीडशेपेक्षा जास्त जागा लढवण्याचा निर्धार भाजपच्या नेत्यांनी केला असला आणि एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना उर्वरित जागा देण्यात येणार असल्या तरीही मुख्यमंत्रिपदाचा विषय अद्याप महायुतीच्या नेत्यांनी चर्चेला घेतलेला नाही. या विषयावरून वाद नको अशीच भूमिका महायुतीच्या नेत्यांनी घेतलेली दिसते. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे नेते मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण हा विषय जास्त ताणणार नाहीत आणि सामूहिकपणे मतदारांना सामोरे जातील अशी अपेक्षा या निमित्ताने करावी लागणार आहे. बहुमत मिळाल्यावर मुख्यमंत्री कोण, हे ठरवणे जास्त योग्य हे सर्वांनी समजून घ्यायला हवे. एकूणच आता राजकीय घडमोडी वाढणार आहेत.

## इंड ऑफ मोरालिटी अँड फेक पॉलिटिक्स इरा

कृतिशीलता म्हणजे ऍक्टिव्हिएझम होय. कृतिशीलता ही विचाराच्या बांधिलकी शिवाय आकलनाच्या सतत अध्यायवत प्रयत्न शिवाय सिद्ध होत नाही .कृतिशीलता हा चळवळीतील सहभाग असतो भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळात जे जे सुधारक स्वातंत्र्य सेनानी होऊन गेले त्यांच्या जीवनात विचार आणि कृती याचे अनन्यसाधारण महत्त्व होते, त्यांच्या अथक त्यागाचा पुरावा म्हणजे त्यांनी सोसलेला तुरुंगवास होय त्यागाच्या साठी विचारनिष्ठा विचार बांधिलकी यावरील असीम निष्ठा सिद्ध करत जगणारी पिढी स्वातंत्र्य उत्तर काळात ९० च्या दशकापर्यंत होती भारताचे स्वातंत्र्य आंदोलन हे विचार आंदोलन समर्पण याचे आंदोलन होते. प्रत्यक्ष कृती आणि विचार यातून प्राप्त झालेले स्वातंत्र्याचे महत्त्व अनेकांना प्रतीत होत होते .विचार सरणी यांचे संघर्ष तर सतत चालत होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील या थोर नायकांच्या जीवनात विचाराला महत्त्व अनन्य साधारण होते सत्तेचा विश्र्वस्त गुण हा ते श्रेष्ठ मानत असत सत्ता हे साधन ते मानत असत. सत्ता हे साध्य त्यांच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात नव्हते. भारतीय स्वातंत्र्य ही वसाहत वादी ब्रिटिशांची अनेक हेतूंनी घेतलेली निर्णय कृती होती जागतिक अनेक संदर्भ भारतीय स्वातंत्र्याला होते .दुसऱ्या महायुद्धाच्या उत्तरकाळात आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या करोवा मरो या आंदोलनामुळे उग्र झालेली भारतीय जनता हे अनेक घटक स्वातंत्र्यप्राप्तीला कारणीभूत होते.

स्वातंत्र्य चळवळीची ही चर्चा विचाराचे महत्व कायम पणे टिकण्यासाठी सतत करावी लागणारी गोष्ट आहे. स्वातंत्र्य आणि सत्ता स्वातंत्र्य विचार आणि राजकीय विचार यांच्या महाचर्चा सतत व्हायला हव्यात सत्ता प्राप्त करणाऱ्या वर्ग आणि प्रत्यक्ष विचारसरणीची चिकित्सा करणारा ज्ञान व्यवहार हा भारतात एकाच वेळेला सर्व पातळ्यांवर कायमपने टिकला नाही. सत्तेचे प्रभुत्व जसजसे वाढत गेले तस तसा विद्यापीठीय ज्ञान व्यवहार हा क्षीण दुबळा आणि प्रभावहीन होत गेला सत्ताधाऱ्यांची ज्ञान विश्र्लेषकांच्या प्रति असलेली तुच्छता त्यांनी राज्यशास्त्राच्या नवनवीन संकल्पनांची उपेक्षा ही सुद्धा भारताच्या राजकीय वैरण अवस्थेला कारणीभूत आहे .

भारताचे राजकीय विश्र्व हे विचार विश्र्व नाही हे आघोरी सत्ता का संघर्षाचे शत्रुत्वाचे कारण बनत चालले आहे. भारताच्या सर्व क्षेत्रातील विचारसरणीचे प्रभुत्व नष्ट होत चालले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात ९० उत्तर दशकांमध्ये हे परिणाम मोठ्या प्रमाणात घडून आले आहेत. विचाराची फीजूल ता निर्माण करून सत्ता चालवता येते गिळंकृत करता येते ताब्यात ठेवता येते असे ग्रह बाळगून राजकारण करणाऱ्या सर्व पक्षांच्या व्यक्ती आणि विचारसरणीचे परिणाम भारताला आज भोगावे लागत आहेत.

भारतीय राजकारण ही केवळ विचारसरणी शून्य जागतिक संदर्भ यांच्या शिवाय जन मनाच्या अस्वस्थ अंतर्मनाचा वेध न घेता सत्ताप्राप्ती याच हेतूने पुढे चालत आलेली आहे. लोकशाही समाजवाद जागतिक भांडवलशाहीचा निरंतर विकास क्रोनिक कॅपिटलिसम फाशीवादाचा सुप्त धोका आधुनिक उत्तर काळाचे विचारसरणीवर होणारे परिणाम भारतातील वंशवादाचा उद्रेक मुलतत्ववाद्यांचा सतत वाढत राहणारा प्रभाव यासाठी रचली जाणारी व्यूह रचना ही भारतीय राजकारण्यांनी विशेषतः लोकशाही समाजवादी विचारसरणीच्या पक्षांनी गांभीर्याने समजावून घेतलेली नाही. जुन्या अवशेषांच्या गौरवीकरणात भारतीय जनमन सतत गुंतलेल्या कथनीतील उदारपणा आणि करणीतील संकीर्णता हे भारतीय गुणदोष कायम वाढत चालले आहेत. राजकारण हे परिवर्तनाचे हत्यार आहे. संविधानाच्या संरक्षणासाठी राजकारणाची अपारहार्य स्वीकृती आणि संचालन करणे आवश्यक आहे हा विचार नष्ट करून बदनाम राजकारण बदनाम विचारसरण्या बदनाम ऍक्टिव्हिझम हे सहज झाले नाही.

चळवळी मारणे चळवळी फोडणे ऍक्टिव्हिस्ट रोकने हे इथल्या वंशवादी भांडवलशाहीने शिस्तबद्ध पद्धतीने केले आहे. ऍक्टिव्हिस्ट हा चळवळीचा समर्थक असता कामा नये .तो विश्र्लेषक असता कामा नये. त्याला स्वतंत्र विचारसरणीचे समर्थन करता येणार नाही .तो वास्तव निरपेक्ष भूमिका विहीन असला पाहिजे. अशा प्रकारचे विचार राजकारण ९० च्या दशकात ज्ञान व्यवहारात माध्यमांच्या मधून मूलतत्त्ववाद्यांनी रुजवले, आणि भारतातील विचारविश्र्व विद्यापीठ क्षेत्रातून संपवण्यामध्ये त्यांना यश मिळवले .भारतातील विद्यापीठे राज्यशास्त्राचे विश्र्लेषक विचारवंत हे आधुनिक उत्तर काळ नेहरू उत्तर भारत ,आधुनिक भारत ,बदलता महाराष्ट्र, बदलाच्या वळणावर अशी अनेक प्रकारची धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची एकांगी व मर्यादित वर्तुळात गौरवीकरणात चर्चा करत व्यस्त राहिले .प्रत्यक्ष व्यापक समाज हा मात्र देश संविधान राजकीय पक्ष विचारसरण्या त्यांचे जाहीरनामे या सर्वांच्या पासून अलिप्त बेफिकीर आणि तुच्छतेने वागत राहिला. असूनही राज्यशास्त्राच्या चर्चा आणि ज्ञान व्यवहारात व्यापक समाजाला समाविष्ट करून घेण्यात आले नाही किंबहुना राज्यशास्त्र ही विचारवंतांची आधुनिक राष्ट्रवाद राष्ट्रवादाच्या निर्मितीची कारणे बदलता राष्ट्रवाद राष्ट्रवादाच्या निर्मितीतील अडसर या चर्चा मर्यादित वर्तुळात विचारवंत करत राहिले. राजकीय पक्ष नवे कार्यकर्ते सत्तेची मांड कायम राखणारे राजकारणी नेते यांनी या विचार विश्र्वाकडे कायम दुर्लक्ष केले तुच्छतेने पाहिले. या सर्व ज्ञान व्यवहाराचा भारतीय राजकारणाशी अन्योनसंबंध आहे, त्याचे आकलन आवश्यक आहे .याचे महत्त्वही या सत्तापीपासून नेत्यांना वाटले नाही आणि त्यामुळे भारताच्या विचारसरणीच्या चर्चा विश्र्वाला कधीच महत्त्व प्राप्त झाले नाही.

आधुनिक राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता, हिंदुत्व आणि हिंदुस्थानी सांची विरासत, एकात्मतेचे नवे अनुबंध यासारख्या समाजातील प्रत्येक घटकाची चर्चा आणि त्यातील योगदान आणि भूमिका यांचा व्यापक पट भारतात स्वातंत्र्योत्तर काळामध्ये पुढे आला नाही. बहुसंख्यांक समाज राज्यशास्त्र राजकारणाशी संबंधित आहे .आपल्या जीवनाचा त्याच्याशी काही संबंध नाही. सत्ताधारी पक्ष नेते आणि निवडणुका म्हणजे राज्यशास्त्र इतके मामुलीकरण भारतीय विचार विश्र्वाचे समाजाने स्वतः करून ठेवले आहे ,त्यामुळे सत्ताधारी सत्ता अंध आणि सत्ता लोलूप दलाल यामुळे भारताचे राजकीय विश्र्व अत्यंत अंधकारमय झाले आहे, यामधून जनसामान्यांच्या जीवना आकांक्षा फुलने साकारणे असंभव आहे. या सर्वांची कारणे उपेक्षा ही तर आहेच पण त्याहून जनतेने लोकसेवकांच्या बाबत घेतलेली भूमिका चुकीची आहे. लोकसेवक लोकप्रतिनिधी हे श्रेष्ठ असतात ते आपले सेवक असतात, त्यांच्यावर आपले नियंत्रण असायला हवे. ते जात धर्म विरहित वर्तनवादी असायला हवेत. हा आग्रह जनतेने सोडून दिला यात या तीन दशकाचा परिणाम सत्ता अंध दलाल निर्माण झाले, आणि यातूनच राज्यशास्त्र सैदांतिक राजकारण विचारसरणीचे राज्यकारण नव्या व्यापक विवरचना सामाजिक सरचनेची निष्कर्षणे ही राजकारणात वापरावयाची असतात याबद्दलच्या आकलनापासून संपूर्ण समाज दूर गेला .हे सातत्याने होत गेल्यामुळे जागतिक पटलावरील राज्यव्यवस्थांच्या व्यवहारात होत गेलेले बदल हे भारतात सुद्धा होत आहेत ,याचे आकलन राजकीय पक्षांनाही झाले नाही नवोदित तंत्र साक्षर वर्ग हा कौशल्याच्या आधारे जागतिक भांडवलाच्या व्यवस्थेत संपत्ती निर्माण करणारा वर्ग देशा तयार झाला आहे.या देशातील सांस्कृतिक संचिता बद्दल तो व्रथा अभिमानी बनू लागला आहे.या देशाच्या इतिहास परंपरा स्वातंत्र चळवळ याचे आकलन आणि प्रेम न करता न समजावून घेता राष्ट्रभक्तीच्या रोगाने पछाडला दूर राहून चंगळवादी वर्तनाचे आदर्श देशी बांधवांना तो देऊ लागला आणि वंशवादी पुनर्जीवन वादी सांस्कृतिक राजकारणाचा समर्थक तो बनला आणि त्याने या देशाच्या स्वातंत्र्य चळवळीतून विचारसरणीचे पुढे आलेले राजकारण उध्वस्त करण्याचे प्रयत्न चालू ठेवले. हे विद्यमान पक्षांना आणि नेत्यांना कळालेच होते असे म्हणता येत नाही.

भारताचा सर्व ज्ञान व्यवहार हा कृतीशील राहिला होता. तो ९० च्या दशकानंतर राहिला नाही आधुनिक समाजाच्या जगण्याच्या उपभोगवादी कल्पना तत्त्वनिष्ठा भिजूल असते त्याहीपेक्षा भौतिकता श्रेष्ठ असते मूल्य स्वीकार याला महत्त्व नाही कृतिशीलता हिचे आणि बांधिलकीचे काही एक नाते असले पाहिजे याची गरज नाही अशा मानसिकतेचा व विचाराचा नव मध्यमवर्ग हा भारताच्या राजकीय विनाशाच्या अवस्थेला कारणीभूत आहे भूमिका शून्य अलिप्त आणि निष्क्रिय राहून सुप्त कपट राजकारण करणारा मध्यमवर्ग हा पुनर्जीवन वाघाचा समर्थक बनला आणि यातूनच भारतीय स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारण आणि राज्यशास्त्रीय ज्ञान व्यवहार हे नेहमी विसंगत अपयशी आणि चुकीचे ठरत गेले याचे कारण भूमिका नाहीत सिद्धांत आणि तत्व यांचे आकलन नाही सार्वत्रिकता हा जीवन व्यवहाराचा पाया असतो राष्ट्र ही एकात्मतेची गोष्ट असते समानतेचा प्रदेश हा सर्वांनी स्वतःहून तयार करावयाचा असतो .बंधुत्वाचा यहवादी अनुभव हा प्रत्येक नागरिकांनी घेत इतरांना तो प्राप्त करून द्यावयाचा असतो ही स्वातंत्र्य मूल्यांची साक्षरता राज्यशास्त्रातून जनमनाच्या तळापर्यंत पोहोचणे आवश्यक होते .ती पोहोचली नाही निवडणुका पक्ष म्हणजे राज्यशास्त्र अशा प्रकारची जुजबी वर्तन प्रक्रिया स्वातंत्र्योत्तर काळात मध्ये ज्ञान व्यवहारातून पुढे आली अत्यंत तकलातून ज्ञान व्यवहार कृतीशीलतेची दुय्यम भूमिका आणि चळवळींच्या बद्दल उपेक्षा बदनामी करीत राहणे, यातूनच चळवळी वळवली च्या स्वरूपात वर्तन करतात अशी टीका करणारे लोक मोठ्या प्रमाणात वाढले, यातूनच भारताचे पराभूत राजकीय विश्र्व अपयशी अपरिवर्तनशील आणि आत्मविश्र्वास शून्य असे तयार झाले .आज समाज आत्मविश्र्वास शून्य वर्तन करू लागला आहे .अस्वस्थ अस्थिर समाज निर्माण झाला आहे. राष्ट्रापेक्षा वैयक्तिक जीवन त्यातील गरजांची पूर्तता त्यासाठी गैरवर्तनाचा सतत स्वीकार करू पाहणारा भारतीय नागरिक हे भारतीय राज्यशास्त्राच्या साक्षरतेचे पूर्ण पराभवाचे लक्षण आहे .भारतीय राज्यशास्त्राच्या विचारवंतांच्या प्रबोधनाचा पराभव म्हणजे नागरिकांची र राजकीय निरक्षरता होय.

स्वातंत्र्योत्तर काळात भिन्नभिन्न विचारसरणीचे महान नायक भवताला मध्ये होते, आणि आहेत पण स्वातंत्र्य मिळाले आता स्वातंत्र्य आंदोलनाचे उदात्तीकरण नको विचारसरणीचा महिमा नको आता विकास आधुनिकता आणि महानगरीय विकासांचा वेगवान प्रवास यासाठी सर्व प्रकारच्या निर्बंधांची मोडतोड करणे, यातून सर्व सार्वजनिक व्यवस्था शासकीय व्यवस्था आज उध्वस्त होत चालले आहेत. तरीही नागरिकांची सहनशीलता उद्याचा आशावाद उद्याचे विकसित राजकीय विश्र्व आणि जाब दायित्व पारदर्शकता आणि गतिमानता मूल्यांच्या आधारे सुधारणारे भविष्यातील राजकारण यावर विश्र्वास ठेवणारा भारतीय नागरिक हा राजकीय निरक्षर तर आहेच पण तो राज्यशास्त्राच्या विचाराच्या कित्येक कोस दूर आहे जग पुन्हा अंतरवर्तुळीय संस्कृती वंश भाषा श्रद्धाने अस्मिता आणि आचार रूढी परंपरा यांच्या उलट्या प्रवासाने निघाले आहे. मानवी विचार ज्ञान बुद्धिमत्ता यांच्या सुजन नवनिर्माण व्यवहाराच्या पलीकडे कृत्रिम बुद्धिमत्तेचा जेनेटिक डाटा व डीएनए सॉफ्टवेअर हे नेहमी तयार करून माणसांना पुन्हा निर्माण पासून रोखण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत .भांडवलशाहीच्या टोकाच्या जर्जर व्यवस्था तयार होत आहेत वंश शस्त्र आणि ईश्र्वर प्रतीकांचा हैदोस हाच जगाचा प्रवास सुरू झाला आहे मानवी सभ्यता हिचे विखंडन हेच वर्तमान आहे मानवी सभ्यता या संख्या असतात .सभ्यतांच्या मध्ये नवी भर घालणे हे चालू आहे असे म्हणता येत नाही. राजकीय सभ्यता संसदीय सभ्यता पक्षीय सध्याता लोकशाही राष्ट्र संचालन सभ्यता यांच्या बद्दल कमालीची उदासीनता आणि या सर्व सभ्यता विकसित करणे याबद्दलचा वर्तन अभाव सार्वत्रिक जीवनात आढळून येतो आहे, म्हणूनच सभ्यता ही ज्ञानाची अविस्कृत कृती आहे सभ्यता हा श्रद्धां मूल्यांचा वर्तन भावआहे. सभ्यता या आधुनिक उत्तर काळातील मानव जातीच्या अनेक समूहांनी ज्ञानातून वर्तनातून तयार केलेली नवी मानवी मूल्य आहे. सर्व प्रकारच्या प्रभूसत्तांच्या पलीकडे मुक्तिदायी जीवनाचा मार्ग यहवादी जीवनाच्या अनुभूतीसाठी स्वीकारणारे जनसमूह पुढे येत आहेत. आणि भारतात मात्र पुन्हा ईश्र्वर प्रतीकांच्या भया खाली सर्व समाजाला जोखंड बांधणे चालू आहे.

भारतातील कोणते नायक मौलाना अबुल कलाम आझादंपासून राजेंद्र प्रसादांच्या पासून गांधींचे नेहरू पर्यंत नेहरू ते लालबहादूर शास्त्री पर्यंत आंबेडकर ते राम स्वामी पेरीयारापर्यंत कितीतरी नायकांचा हा भारतीय प्रदेश आज हिंसेच्या छायेखाली आला आहे .हा अहिंसेचा प्रदेश शांतीसाभावाचा भवताल आज अविश्र्वासाने ग्रासला आहे. एकमेकापासून तुटला आहे इथले राज्यशास्त्र शैक्षणिक गौरवात परिसंवादात संपत चालले आहे. समाजजीवन आणि त्यांच्या मनोभूमिका लोकशाहीवादी बनवण्यात स्वातंत्र्योत्तर काळात कुठल्याही क्षेत्राला यश आले नाही .

शिवाजी रावत, विश्लेषक सातारा

पान १ वरुन

### आता राज्यात‘लाडका शेतकरी..

असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना केवळ १ रुपया विमा हप्ता भरून प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य असून साडेसात अश्र्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ‘कष्टकरी, वारकरी आणि सुखी शेतकरी’ हेच शासनाचे धोरण असून राज्यातील कांदा, सोयाबीन, कापूस आणि दुधाला योग्य मिळवून देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. माझी लाडकी बहीण योजनेमुळे महिलांच्या सक्षमीकरणामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळणार असून ही योजना कायमस्वरूपी सुरु राहणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. तसेच कृषि क्षेत्रातील नवीन बदलांची माहिती शेतकऱ्यांना मिळण्यासाठी, आधुनिक शेतीला चालना मिळून राज्यातील कृषि क्षेत्राचा विकास होण्यासाठी कृषि महोत्सव उपयुक्त ठरेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी आणि त्यांना सन्मान मिळवून देणारी असल्याचे नमूद करून ही योजना सुरु केल्याबद्दल केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी राज्य शासनाचे अभिनंदन केले. राज्यातील शेतकऱ्यांना केंद्रात न्याय मिळवून दिला जाईल, असे सांगून ते म्हणाले की, केवळ १ रुपयात प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ देणारे आणि प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी महासन्मान योजना राबवून शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रयत्नशील आहे. महाराष्ट्रातील सोयाबीन, कापूस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांना शेतमालाचा योग्य दर मिळवून देण्यासाठी केंद्र व राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे कृषिमंत्री श्री. चौहान म्हणाले.

मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. समुद्रात वाहून जाणारे ५० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतची योजना अंतिम टप्प्यात असून बीड जिल्ह्यातील आष्टीपर्यंत लवकरच हे पाणी येईल. यासाठी मराठवाड्याचे हक्काचे पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी सुमारे ११ हजार कोटींची कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजना हाती घेण्यात आली आहे. ११ सिंचन प्रकल्पांसाठी १३ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पातून शेतकऱ्यांना विविध बाबींचा लाभ देण्यासाठी ६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. तसेच जायकवाडी प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी ५३६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून माजलगाव कालव्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यामुळे मराठवाड्यातील ८५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे मराठवाड्याचा सिंचनाचा अनुशेष दूर होवून शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिलांच्या सक्षमीकरणासाठी गती देणारी ठरेल असे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना कृषि क्षेत्रात होत असलेल्या क्रांतीची, नवीन बदलांची माहिती मिळावी, यासाठी कृषि विभागाने राज्यस्तरीय कृषि महोत्सवाचे आयोजन केले आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च करून त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार केला जात आहे. ड्रोनद्वारे फवारणी, नॅनो युरिया, नॅनो डीएपी वापराबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली जात आहे. यामुळे भविष्यात शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्च जवळपास ३० टक्केने कमी होवून उत्पन्नात २० टक्के वाढ होईल, असा विश्र्वास राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला.

विधानपरिषद सदस्य पंकजा मुंडे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकामध्ये कृषि आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी राज्यस्तरीय कृषि महोत्सवाबाबत माहिती दिली. पाच दिवसीय कृषि महोत्सवात शेतकऱ्यांना नवनवीन प्रयोगांची माहिती देण्यासाठी चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले असून ४०० पेक्षा अधिक दालनांतून शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान, प्रयोगांची माहिती दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी महिला आणि शेतकऱ्यांच्यावतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांचा एकत्रित हार घालून सत्कार करण्यात आला. तसेच बैलबंडी भेट देण्यात आली.या कार्यक्रमास व्यासपीठावर आमदार विक्रम काळे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार नमिता मुंदडा, आमदार बाळासाहेब आजबे, माजी आमदार टी.आर. जिजा पाटील, माजी आमदार सुरेश धस, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन क्षिप्रा मानकर यांनी केले, आत्माचे प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांनी आभार मानले.

### आपले सरकार पोर्टल २.० द्वारे..

नागरिकांना त्यांच्या तक्रारी मांडण्यासाठी आणि वेळेवर निराकरण शोधण्यासाठी सक्षम करते. या उपक्रमाचे महत्व अनमोल आहे, कारण हे शासनाच्या उत्तरदायित्वाच्या बांधिलकीचे प्रतीक आहे, असे या पोर्टलचे महत्व श्री. दवे यांनी सांगितले.

नागरिकांसाठी आपले सरकार थेट आणि कार्यक्षम चॅनेल प्रदान करते ज्याद्वारे ते त्यांच्या तक्रारींचे निराकरण करू शकतात. ही प्रणाली सरकारच्या कार्यालयात अनेक वेळा भेट देण्याची गरज दूर करते, वेळ आणि मेहनत वाचते, प्रत्येक तक्रारीचे ट्रॅकिंग आणि निराकरण सुनिश्र्चित केले जाते, त्यामुळे शासनावर विश्र्वास निर्माण होतो. अखेरीस, आपले सरकार पोर्टल हे लोकांच्या सेवेसाठी आणि त्यांच्या जीवनमानात सुधारण करण्यासाठी शासनाची कटिबध्दता दर्शवत आहे, असे श्री. दवे यांनी सांगून अधिकाऱ्यांसाठी आपले सरकार कार्यक्षमतेने राबविणे अत्यंत महत्वाचे आहे. हे फक्त सार्वजनिक तक्रारींचे व्यवस्थापन कार्यक्षमतेने वाढवत नाही, तर जबाबदारी आणि उत्तरदायित्वालादेखील प्रोत्साहन देते. अशा डिजिटल उपायांचा अवलंब करून, नवोपक्रम आणि सार्वजनिक सेवेत उत्कृष्टतेसाठी बांधिलकी दर्शवित असल्याचेही त्यांनी सांगितले.

पोर्टलवर आलेल्या तक्रारींचा निपटारा सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेत करावा कोणतेही तक्रार जास्तीत जास्त २१ दिवसात निकाली काढावी. जो विभाग जे अधिकारी पोर्टल वरील तक्रारींचा निपटारा वेळेत करत असतील अशा अधिकाऱ्यांना नागरिकांकडून चांगल्या प्रकारचे रेटिंग मिळू शकते. या नवीन पोर्टलमध्ये शासकीय कार्यालय, विभाग व अधिकारी यांच्यासाठी नागरिकांकडून रेटिंगची पद्धत सुरू करण्यात आलेली आहे. या प्रकारे श्री. दवे यांनी आपले सरकार २.० पोर्टल बाबत सविस्तर प्रशिक्षण उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

### काँग्रेसचे दिग्गज वकील ..

झाला ती लोकांची प्रतिक्रिया होती. जे घडलं ते अत्यंत घृणास्पद आहे. फाशीची मागणी झाली आहे. लोकांची उत्स्फुर्त प्रतिक्रिया होती. कायदेशीर प्रक्रियेने आपल्याला पुढे जावं लागतं. माझं आणि देवेंद्र फडणवीस यांचं बोलणं झालं आहे. अधिकृत रित्या मला वकीलपत्र देण्यात आलेलं नाही. मात्र या प्रकरणात मी लक्ष घालावं असं देवेंद्र फडणवीस यांनी मला सांगितलं आहे असंही उज्ज्वल निकम म्हणाले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# रिपाईचे तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांचे एम.एस.ई.बीच्या विरोधात अनोखे आंदोलन



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट / हणमंत घोदे : अक्कलकोट शहरातील विवध भागामध्ये सोमवारी रात्री १०:३० ते पहाटे ५.०० वाजेपर्यंत देखील लाईट नसल्याने रिपाइंचे आठवले गटाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांना शहरातील विविध भागातील अनेक नागरिकांनी फोन करून एम एस ई बी कार्यालयाच्या भोंगळ कारभाराविरुद्ध वारंवार तक्रार असल्याचे सांगितले. त्यावेळी तत्परता दाखवून अविनाश मडिखांबे यांनी त्वरीत विज मंडळ कार्यालयात पोहोचले, आणि तेथील कर्मचाऱ्यांना त्वरित शहरातील अनेक भागात लाईट दुरुस्ती करण्याची सुचना केली. जर लाईट आली नाही तर आजचा मुक्काम तुमच्या कार्यालयात होईल असे सांगून मडिखांबे यांनी मध्य रात्री १.०० ते लाईट येईपर्यंत ते कार्यालयात अंथरून घेऊन झोपले या अनोख्या आंदोलनाची अक्कलकोट शहरात चर्चा सुरू झाली आहे.गोरगरीब जनतेसाठी अहोरात्र झटणारा सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी दिवस रात्र एक करणारा अक्कलकोट तालुक्यातील बुलंद आवाज रिपाइंचे तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे होय असे जनता बोलत आहे.

# रिपाई प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवस निमित्त तडवळ येथे वृक्षारोपण शालेय साहित्य व खाऊ वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी: तालुक्यातील तडवळ शाखचे वतीने तडवळ येथील जिल्हापरिषद प्राथमिक कन्नड शाळा मराठी शाळा उर्दू शाळा येथे रिपाइं आठवले गटाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप खाऊ वाटप तसेच चित्रकला व रांगोळी स्पर्धातील विद्यार्थ्यांना एक वह्या एक पेन एक सिस पेन वाटप करून वृक्षारोपण करण्यात आले

सदार कार्यक्रम रिपाइं तालुका अध्यक्ष तालुका अध्यक्ष अविनाश



मडीखांबे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले

यावेळी रिपाइं युवक तालुका अध्यक्ष आप्पा भालेराव, तालुका कोषाध्यक्ष अंबादास गायकवाड, तालुका कार्यध्यक्ष राजू बोरगाव, युवक तालुका उपाध्यक्ष दिलीप माळी, तडवळ ग्रामपंचायत सदस्य उमेश शिवशरण सिद्धार्थ गायकवाड, राजशेखर गायकवाड,बाबासाहेब गायकवाड, कामराज पद्माकर मराठी शाळा अधक्ष कोरे उर्धू शाळेच्या अध्यक्ष व कन्नड शाळा अध्यक्ष राजू शिवशरण केंद्रप्रमुख म्हेत्रे साहेब मुख्याध्यापक गौतम कांबळे सर,कुंभार सर,उमराणी सर, कोळी सर, श्री पटणशेट्टी सर, श्री स्वामी सर,श्री शिवशरण सर, श्री येळेगाव सर,श्री फुगटे सर,श्री हलसंगी सर,श्री पटेल सर,मराठी शाळेचे मुख्याध्यापिका सुसलादी मॅडम, कांबळे मॅडम,मुल्ला मॅडम,नाटीकर मॅडम,खाजपा शिवशरण,सजु बनसोडे,लायपा गायकवाड,परशुराम शिवशरण,अरूण गायकवाड,यलापा शिवशरण,सुनिल शिवशरण परशुराम कोरे,अमोल शिवशरण,महेश शिवशरण,राजु शिवशर,शकर शिवशरण,सजय कोरे सुबानी शेख आपालाल बोरोटी,विनोद गायकवाड, दुर्गा शिवशरण,आदी व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# बदलापूर घटनेतील माजी नगराध्यक्षांविरोधात पत्रकारांचा आक्रोश

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पुणे : पिंपरी-चिंचवडमधील पत्रकारांनी आज बदलापूर येथील माजी नगराध्यक्ष वामन म्हेत्रे यांच्याविरोधात कडक कारवाईची मागणी केली आहे. म्हेत्रे यांनी बदलापूरमधील एका आंदोलनादरम्यान वृत्तांकन करणाऱ्या महिला पत्रकार मोहिनी जाधव यांना अर्वाच्य भाषा वापरली आणि त्यांचा अपमान केला होता. पत्रकारांनी नायब तहसीलदार जयराज देशमुख यांच्याकडे निवेदन देऊन म्हेत्रे यांच्यावर



कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. पत्रकारांनी म्हेत्रे यांच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्याचीही मागणी केली आहे. महिला पत्रकार सरकारसाठी लाडक्या बहिणी नाहीत का ? असा सवाल करत महिला पत्रकारास अर्वाच्य भाषा वापरणाऱ्या वामन म्हेत्रेंवर कायदेशीर कारवाई करा, अशी मागणी पिंपरी चिंचवड मधील पत्रकारांनी केली आहे.

# कोठुरे स्वा.सावरकर विद्यालयात समाजदिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

निफाड/प्रतिनिधी: मराठा विद्या प्रसारक समाज संचलित स्वा. सावरकर विद्यालय कोठुरे येथे संस्थेचे आद्य संस्थापक कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्मदिवस समाज दिन म्हणून साजरा करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय समितीचे सदस्य पुंजाराम कडलग तसेच शालेय समितीचे सर्व सदस्य, शाळेला वेळोवेळी आर्थिक सांस्कृतिक व सामाजिक मदत करणारे दानशूर व्यक्ती ही उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या समाज ध्वजाचे ध्वज पूजन व ध्वजारोहण शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य विष्णू परसराम मोगल यांच्या हस्ते करण्यात आले असून. उपस्थित मान्यवराच्या हस्ते संस्थेतील कर्मवीरांचे प्रतिमांचे पूजन करण्यात आले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक सानप एस डी यांनी केले. कर्मवीरांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी इयत्ता दहावीची विद्यार्थिनी दिव्या कोरडे हिने व. शिक्षकांच्या वतीने ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र पाटील,. सुमित भामरे यांनी आपले मनोगत व्यक्त करून कर्मविरांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर विद्यालयातील रांगोळी स्पर्धांचे उद्घाटन मधुकर पवळे व प्रकाश टरले यांच्या हस्ते



करण्यात आले. पुष्परचना स्पर्धेचे उद्घाटन शालेय समितीचे जेष्ठ सदस्य सुधाकर मोगल यांनी केले तर पाककला स्पर्धेचे उद्घाटन सुयोग गीते व तुषार मोगल यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धांचे नियोजन सुनीता दाणी, गायत्री जाधव व प्रियंका आव्हाड यांनी केले.विद्यालयात समाज दिनाच्या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मान्यवरांच्या हस्ते यावेळी पार पडला,... विद्यार्थ्यांच्या गुणगौरवाचे नियोजन विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक सावकार यांनी केले. असुन विद्यालयाच्या प्रागणात इको क्लब व विज्ञान छंद मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण पूरक रक्षाबंधन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले, या कार्यक्रमाचे नियोजन संजय निकम, किरण भडांगे, रोशन दवते, नंदिनी गावले ,सुरेखा झोमन यांनी केले होते.याप्रसंगी संस्थेचे ज्येष्ठ सभासद माधवराव गीते, अनंत कोरडे, संदीप टापसे, प्रताप मोगल, रामकृष्ण वडघुले, रावसाहेब निफाडे , भगवान कोरडे,शरद चोबे, दिलीप मोगल,सोपान कोरडे, विष्णू मोगल, बाळासाहेब सताळे मुळे ताई ,कुलकर्णी ताई ,रेखा दिघे यासह ग्रामस्थ ,पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते, सांस्कृतिक समिती प्रमुख सुधाकर निकम, गौतम जाधव, संजय गायके यांनी विशेष प्रयत्न केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती नंदिनी गावले यांनी केले.

# बहिणींच्या आनंद हाच आशीर्वाद मानतो : अभिजीत पाटील

## महिला सक्षमीकरण आणि सबलीकरणासाठी माय-माऊलींना स्वतःच्या पायावर उभा करण्यासाठी कायम प्रयत्न करणार : अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी: 'खेळ पैठणीचा' कार्यक्रम मोठ्या आनंदात आणि माता भगिनींच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला. यातून त्यांना मिळणारा आनंद हाच मी आशीर्वाद मानतो, असे प्रतिपादन श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावरचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी केले.

सध्या विधानसभेच्या तोंडावर मतदारसंघांमध्ये भेटीगाठी व कार्यक्रम घेण्याच्या दृष्टीने अभिजीत पाटील आपला जनसंपर्क वाढवत असून विविध कार्यक्रम घेत असताना माढा तालुक्यात अभिजीत पाटील यांनी आपला चांगला चंग बांधलेला दिसून आला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये माढा केसरी म्हणून कुस्ती स्पर्धा टेंभुर्णी येथे घेण्यात आल्या होत्या. अभिजीत पाटील यांनी माढा तालुक्यातील माळशिरस तालुक्यात जोडलेल्या १४ गावांमध्ये देखील आपला जनसंपर्क वाढवत असल्याचे




दिसून आले. नागपंचमी व रक्षाबंधनानिमित्त विठ्ठल प्रतिष्ठान आयोजित अभिजीत आबा पाटील मित्रपरिवार महाळुंग यांच्या संकल्पनेतून वतीने 'खेळ पैठणीचा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी श्री विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील बोलताना म्हणाले...संसाराची जबाबदारी पेलून अविरत कर्तव्य पार पाडणाऱ्या माता भगिनींना विरंगुळयाचे आणि एकत्रित आनंदाचे काही तास मिळावे यासाठी या अभिनव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. यास मिळणाऱ्या उस्फुर्त प्रतिसाद आणि सर्व वयोगटातील सहभाग यामुळे प्रत्येक गावात हा कार्यक्रम यशस्वी होत आहे. 'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाला महाळुंग येथे उस्फुर्त प्रतिसाद.. शेकडो महिलांनी विविध खेळांमध्ये सहभाग घेतला आणि उत्कृष्ट संयोजनातून विलक्षण आनंदाचे वातावरण निर्माण झाले.या सर्व खेळामध्ये प्रथम क्रमांकाच्या विजेत्या सौ.जागृती सुरज कुंटे, द्वितीय क्रमांकाच्या सौ.सोनाली औदुंबर जाधव, तृतीय क्रमांकाच्या रूपाली प्रभाकर भगत व चतुर्थ सौ.वैष्णवी प्रशांत काळे या मानकरी ठरल्या.या कार्यक्रमाचे निवेदिका मोनिका जाजू यांनी केले. यावेळी नगराध्यक्षा लक्ष्मीताई चव्हाण, श्रीमतीदेवी मदन पाटील, मा.सरपंच अर्पणदेवी काकी पाटील, नगरसेवक प्रकाश नवगिरे, शिवसेना तालुका उपप्रमुख नितीन वाघमारे, सिद्धेश्र्वर पवार, भाग्यश्री भोसले, सुवर्णा गाडेकर, नेहा तळेकर, सोनाली जगताप, जयश्री दासू जमदाडे, जयश्री बनसोडे, निता शिंदे, रूपाली जमदाडे, संगीता बागल, मंदाकिनी पाटील, भारती बनसोडे, सुनीता मोटे, शितल लवटे, सुरेखा थिटे, वर्षाला वाघमारे, सविता बचुटे यासह अजिंक्य पाटील, भोसले मित्र परिवारांने यशस्वी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

# बदलापूर शहरात आणि राज्यामध्ये चाललेल्या महिलांच्या शोषणाविरुद्ध अत्याचाराविरुद्ध आंदोलन




**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : आज पिंपरी येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात घेण्यात आले आंदोलन अनेक महिला भगिनींनी आपले विचार व्यक्त केले आणि सरकारवर प्राचार्य ओढले यावेळी संघटनेचे अध्यक्ष दुर्गा भोर यांनी शासनाने महिला सदस्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष असून आता महिलांचं हातामध्ये शस्त्र उचलण्याची वेळ होईल.

शासनाने कठोर कारवाई करून आतापर्यंत झालेल्या घटना मधील आरोपींना कठोरात कठोर शासन मृत्युदंड द्यावा अन्यथा महाराष्ट्र मध्ये महाराष्ट्राचा बिहार झाल्याशिवाय राहणार नाही असे सांगितले तसेच अनेक महिलांनी यावेळी पोलीस खाते शासन आणि प्रशासनाच्या विरोधात नाराजी व्यक्त केली मार्गदर्शन श्री अभय भोर यांनी राज्यातील पुरुषांनी सुद्धा पुढाकार घेऊन महिलांनीच महिलांसाठी मोर्चे नाही तर पुरुषांनीही महिलासमोर भिंत बनवून राहिले पाहिजे महिलांकडे वाकड्या नजरेने बघणार्याची डोळे काढून ठेवले पाहिजे शासनाने लाडकी बहीण योजना कडून दीड हजार रुपये दिले परंतु आज महाराष्ट्रात अनेक बहिणींनाही दीड हजार रुपये त्यांच्या कफन वेळ येऊ नये पुढील काळामध्ये कठोर शासन करण्यासाठी शासनाने परवानगी द्यावी आणि लाडके बहीण योजनेपेक्षा महिलांना सुरक्षा अनेक आधुनिक यंत्रणा वापरून त्वरित कारवाई करण्याची मागणी केली या ठिकाणी दुर्गा ब्रिगेड संघटनेच्या असंख्य महिला उपस्थित होत्या

# पंढरपूर येथील शिबिरात १ हजार ८32 दिव्यांगांचा सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी: पंढरपूर उपजिल्हा रुग्णालय येथे दिनांक १९ व २० ऑगस्ट २०२४ रोजी महसूल विभाग, पंचायत समिती पंढरपूर, उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर व दिव्यांग कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तालुक्यातील १ हजार ८३२ दिव्यांग व्यक्तींनी या उपक्रमामध्ये सहभाग नोंदवला.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे दोन दिवस तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे तसेच उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश सुडके व वैशयपायन वैद्यकीय महाविद्यालयाचे तज्ञ डॉक्टर यांच्या उपस्थित हे शिबिर यश्र्वस्वी पार पडले.

या शिबिरात दृष्टी दोष २४२, श्रवण दोष ३०७, बौध्दीक अपंगत्व ३८७, अस्थिव्यंग ७८०, लहान मुलांचे व्यंग १२० अशा विविध व्यंगांची तपासणी करण्यात आली असून यामध्ये पात्र लाभार्थ्यांना घरपोच मिळणार प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. दिव्यांगांना शिबिराच्या ठिकाणी येण्यासाठी व जाण्यासाठी वाहन व्यवस्था, व्हीलचेअरची व्यवस्था, वॉटर प्रुफ मंडप, स्वच्छ पिण्याचे पाणी, नाश्ता, जेवण, स्वच्छता गृह आदी व्यवस्था करण्यात आली होती. दिव्यांगांसाठी असणाऱ्या शासनाच्या विविध योजनांच्या लाभांची माहिती व्हावी यासाठी माहितीचे बुकलेट तयार करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी विविध विभागाच्या वतीने माहितीचे स्टॉल लावण्यात आले होते.

सोलापूर जिल्हयातील तालुकानिहाय ग्रामिण रुग्णालय तथा उप जिल्हा रुग्णालय अशा एकुण २५ ठिकाणी दिव्यांग बोर्डाच्या तज्ञ डॉक्टरां मार्फत एकूण १५ हजार ६६६ व्यक्तींची दिव्यांगत्व तपासणी व निदान करून पात्र दिव्यांगत्व प्रमाणपत्र आणि वैश्र्विक ओळखपत्र (णऊखऊउ-ठऊ) स्पिड पोस्टने घरपोच देण्यात येणार आहे. तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या प्रचार प्रसिध्दी करण्यात येणार असून, आशाताई आणि यंत्रणेतील तालुका स्तरावरील संबंधित घटकांसाठी कार्यशाळा घेण्यात आल्या असून प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती मित्राचे संचालक अभिजीत राऊत यांनी दिली.



# सोलापूर जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यासाठी उच्चाधिकार समितीकडून २८२.७५ कोटी मंजूर : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**✻ मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीची लवकरच बैठक होऊन या पर्यटन आराखड्याला अंतिम मंजुरी मिळणार व त्यानंतर शासन निर्णय निघणार आहे ✻ उच्चाधिकार समितीच्या अध्यक्ष तथा मुख्य सचिव सुजाता सौनिक व अन्य सर्व सदस्यांनी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी मांडलेल्या संकल्पनांचे व सादरीकरण केलेल्या पर्यटन विकास आराखड्याचे विशेष कौतुक केले. तसेच हा प्रकल्प संपूर्ण राज्यासाठी दिशादर्शक असेल असेही समितीने म्हटले.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्हा हा पर्यटनासाठी खूप महत्त्वाचा जिल्हा आहे. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर पर्यटन पूरक उद्योग वाढवून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती शक्य आहे. यामुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला वेग येईल तसेच येथून होणारे स्थलांतर ही थांबेल. त्यामुळे उजनी जल पर्यटन १९० कोटी १९ लाख, कृषी पर्यटन १९ कोटी ३० लाख, विनयार्ड पर्यटन ४८ कोटी २६ लाख, धार्मिक पर्यटन २५ कोटी असा एकूण २८२.७५ कोटीचा जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज मुंबई येथे राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चाधिकार समितीकडे सादर केला. व समितीकडून या आराखड्यासाठी २८२.७५ कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीमध्ये प्रथम सादर करण्यात आला. जिल्ह्याच्या पर्यटनाच्या अनुषंगाने महत्त्वाच्या बाबी यात नमूद करून त्यासाठी लागणारी तरतूद करून हा आराखडा समितीने मंजूर केला. त्यानंतर पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याला मान्यता प्रदान केली. तर माहे जून २०२४ मध्ये पुणे येथे झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्याकडे हा पर्यटन आराखडा सादर केला होता. त्यावेळी उपमुख्यमंत्री महोदय यांनी या आराखड्याला तत्वत: मंजुरी दिलेली होती.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने मंजूर केलेला हा आराखडा उच्चाधिकार समितीकडे पाठवण्यात आला. आज मुंबई येथे राज्याच्या मा.मुख्य सचिव श्रीमती सुनिता सौनिक यांच्या अध्यक्षतेखालील या समितीने या आराखड्यातील बाबींचे बारकाईने माहिती घेऊन यातील २८२.७५ कोटी रुपयांच्या विविध कामांना मंजुरी प्रदान केली. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याचे उच्चाधिकार समितीसमोर पीपीटीद्वारे सादरीकरण केले. हे सादरीकरण करत असताना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती तसेच पर्यटनासाठी खूप महत्त्वपूर्ण जिल्हा असल्याची माहिती देऊन हा आराखडा मंजूर झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था वेगाने वाढण्यास मदत होईल. तसेच, येथून होणारे स्थलांतर रोखले जाईल यासाठी हा प्रकल्प खूप महत्त्वाचा असल्याचे समितीला जिल्हाधिकारी यांनी पटवून दिले.

✻राज्यासाठी पथ दर्शक प्रकल्प : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उच्चाधिकार समिती समोर सोलापूर जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याचे ज्या पद्धतीने सादरीकरण केले. तसेच, या आराखड्यामध्ये सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पर्यटनाच्या दृष्टीने अंतर्भूत केलेल्या बाबी किती महत्त्वपूर्ण आहेत याची जाणीव समितीला झाली. आराखड्याची मांडणी व सादरीकरणाबद्दल उच्चाधिकार समितीच्या अध्यक्ष तथा मुख्य सचिव व अन्य सर्व सदस्यांनी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचे विशेष कौतुक केले. तसेच, हा प्रकल्प राज्यासाठी पथदर्शक असेल असेही समितीने सांगितले. या बैठकीसाठी जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी उपस्थित होते.

✻एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्पः जिल्ह्यात संपूर्ण जगातील पर्यटकांना जल, कृषी, विनयार्ड व धार्मिक पर्यटनाचा अनुभव देणे हा या एकात्मिक पर्यटन प्रकल्पाचा आत्मा व यु. एस. पी. देखील आहे. यासाठी प्रकल्पातून जिल्ह्यात एकात्मिक पर्यटन सर्किट विकसित केले जाणार आहे. या प्रकल्पाच्या निमित्ताने जिल्ह्यात वेगवेगळी पथदर्शी उदाहरणे (कृषी पर्यटन, कृषी मॉल, जल पर्यटन ई बाबतची मॉडेल्स) उभी राहतील की, जी पर्यटन क्षेत्रात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या जिल्ह्यातील उद्योजकांना पर्यटन क्षेत्रातील विविध संधी दर्शवतील व यासारखे उपक्रम एक व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रेरणा देतील. यामुळे जिल्ह्यात पुढील ८-१० वर्षात पर्यटन उद्योगात मोठी आर्थिक गुंतवणूक होऊन विकासाची प्रकिया वेग धरेल व एकंदरीत स्थानिक व जिल्हावासियांचे जीवनमान उंचावेल.एकात्मिक पर्यटन सर्किटमध्ये उजनी धरणातील जल पर्यटन हे पर्यटकांसाठी मुख्य आकर्षण असेल. पर्यटकांना यासोबतच येथे धरणाच्या जलाशयाचा भाग, सभोवतालील निसर्गरम्य परिसर, जल क्रीडा उपक्रम, विविध देशी तसेच विदेशी पक्षी, ईत्यादीचे नैसर्गिक सौंदर्य न्याहाळता येईल. पुढे सर्किट मध्ये परिसरातील कृषी पर्यटन केंद्रे, धार्मिक स्थळे, विनयार्ड पर्यटन, तलाव, किल्ले, वारसा स्थळे यांना भेटी देता येतील. पर्यटकांना साधारणत: आठवडाभर पर्यटन सर्किटमध्ये असलेल्या विविध स्थळांना (जल, धार्मिक, कृषी, नैसर्गिक विनयार्ड पर्यटन स्थळांना) भेटी देऊन पर्यटनाचा आस्वाद घेता येणार आहे. निश्चितच यामुळे स्थानिक पातळीवर पर्यटन पूरक उद्योग वाढतील, मोठ्या प्रमाणात रोजगाराची निर्मिती होईल व यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होऊन जिल्ह्याची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढण्यासाठी गती मिळणार आहे.या प्रकल्पामुळे सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या प्रकारच्या उद्योग उभे राहण्यास चालना मिळेल व त्यामुळे टूर गाइड, हॉटेल आणि रिसॉर्ट कर्मचारी, अन्न आणि पेय सेवा कर्मचारी, ट्रॅव्हल एजंट, वाहतूक सेवा (बस, कार, टॅक्सी) सुविधा देणारे, विविध कार्यक्रमांचे नियोजन करणारे, मनोरंजनाचे कार्यक्रम करणारे कलाकार / लोक कलाकार, दुकानदार व किरकोळ वस्तू विक्रेते, संग्रहालय आणि वारसा साइट कर्मचारी, संवर्धन कामगार, ग्राहक सेवा प्रतिनिधी, बांधकाम व देखभाल दुरुस्ती कामगार, स्पा आणि वेलनेस कर्मचारी, स्वच्छता सेवा सुविधा देणारे कामगार यांचेसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

**✻ प्रकल्पाची प्रमुख वैशिट्ये** प्रकल्पाची ७ प्रमुख वैशिट्ये खालील प्रमाणे....
जिल्ह्यात वेगवेगळ्या प्रकारच्या पर्यटन स्थळांचे (जल, कृषी, विनयार्ड व धार्मिक) अनोखे मिश्रण (लश्रशपव) एकाच ठिकाणी अनुभवता येणार. ✻ पक्षी निरीक्षण व नौकायन: पर्यटकांना उजनी जलाशय परीसरात पक्षी निरीक्षण आणि नौकायनासाठी एक स्वप्नभूमी असेल. ✻ स्थानिकांचा प्रकल्पात सक्रीय सहभाग: स्थानिक महिला गट व शेतकरी उत्पादक गटांचा प्रकल्पात सक्रीय सहभाग. ✻ उपजीविका विकास: प्रकल्पातून स्थानिकांचा पर्यटनावर आधारित उपजीविका विकास/बळकटीकरणावर भर. ✻डिजीटल वेब पोर्टल : पर्यटन सर्किट व त्यातील स्थळांच्या प्रभावी मार्केटिंग तसेच पर्यटकांना टूर बुकिंगसाठी एक उपयुक्त साधन. ✻सर्वांसाठी पॅकेजेस : पर्यटकांच्या सर्किट मध्ये राहण्याचा कालावधी व खर्च करण्याची क्षमता यांचा विचार करून टूर पॅकेजेस निर्मिती व प्रचार. ✻स्थानिकांची क्षमता बांधणी : इच्छुक बचत गट, उत्पादक गट, उद्योजक यांच्या कौशल्य विकासावर भर. ✻प्रमुख घटक व अंदाजपत्रक: नियोजित उजनी जलाशय जलपर्यटन, कृषी पर्यटन, विनयार्ड पर्यटन व धार्मिक पर्यटन चालना देणाऱ्या प्रकल्पाच्या उभारणीचा एकत्रित खर्च रू. २८२.७५ कोटी असून त्याचा घटकनिहाय खर्च खाली दिला आहे. ✻जल पर्यटन - एकात्मिक पर्यटन सर्किटमध्ये उजनी धरणातील जल पर्यटन हे पर्याटकांसाठीचे मुख्य आकर्षण असेल. उजनी जलाशयाचे पात्र सुमारे ९० किमी लांबीचे पात्र असून त्यात प्रवास करताना गोड्या पाण्याच्या समुद्राचा अनुभव येतो, धरणाच्या जलाशय परिसरात विविध देशी व परदेशी पक्षांचा वावर असतो. जलाशयाच्या अवतीभोवती हिरव्यागार निसर्गाचे व शेतींचे मनमोहक दृश्य पहावयास मिळते. प्रकल्प विकसित करण्यासाठी पाटबंधारे विभागाची जागा उपलब्ध असून ती जागा राष्ट्रीय महामार्गाने जोडलेली आहे. जलपर्यटन हे लोकप्रिय आणि आकर्षक पर्यटन असून व ते कमी वेळात तयार होते. असे हे जागतिक दर्जाचे जल पर्यटन सोलापूर जिल्ह्याची नवीन ओळख निर्माण करू शकते. जल पर्यटन प्रकल्पास कमी जमीन लागते आणि पाण्यावर अवलंबून असते. जलपर्यटनामुळे रोजगाराची निर्मिती, स्थानिक युवकांना कमीत कमी प्रशिक्षणाने चांगल्या पगाराच्या रोजगाराच्या संधी निर्माण होतील. याचा सोलापूर जिल्ह्याच्या स्थानिक अर्थव्यवस्थेवर मोठा प्रभाव पडू शकतो. सोलापूर जिल्ह्यातील जलपर्यटनमध्ये रॉक पूल - सर्व वयोगटातील पर्यटकांना पोहण्यासाठी भारतातील सर्वात मोठा जलतरण तलाव असणार आहे, वॉटर फ्रंट डेक, लाईट हाऊस, बोट रॅम्प, मरीना बोटीची उच्च दर्जाची पार्किंग व्यवस्था इत्यादी पायाभूत सुविधा देण्यात येणार आहेत. त्यासाठी रु.१९०.१९ कोटी प्रस्तावित करण्यात आला आहे.

✻कृषी पर्यटन केंद्र : कृषी पर्यटन केंद्र (५ ठिकाणी प्रमुख मंदिरे व धरणासभोवतालच्या परिसरात) कॉटेजस/निवास व्यवस्था, लोकनिवास (ॐीर्ळीू), डायनिंग हॉल व किचनसाठीची ईमारत, शेततळे, पारंपारिक खेळ सुलभिकरण क्षेत्र (मैदान) व मुलभूत साहित्य, ग्रामीण कला व मनोरंजन कार्यक्रम सादरीकरण केंद्र (-त ड्रींशा), वेगवेगळ्या जुन्या वस्तू /साहित्याचे युनिट उपलब्धता, स्वागत कमान + साइंन बोर्ड, नर्सरी, मचाण,जनरेटर कृषी मॉल (१० ठिकाणी प्रमुख धार्मिक मार्गांवर टोल प्लाझा जवळ) मॉल बांधकाम, फर्निचर आणि फिक्स्चर, रॅकस, ट्रॉली, पाणी पुरवठा व स्वचता सुविधा, पार्किंग व्यवस्था. इत्यादीसाठी रक्कम रुपये १९.३० कोटी प्रस्तावित करण्यात आली आहे.✻विनयार्ड पर्यटन खुडूस ता. माळशिरस येथे विनयार्ड प्रकल्प उभारणे. पारंपारिक घरे, ट्री हाऊस, वैदिक घरे, साहसी उद्यान, लाकडी शैलीचे घरे, ग्लॅम्पिंग पॉड्स, रेस्टॉरंट, कॉंफरन्स, रूम इत्यादीसाठी रक्कम रुपये ४८.२६ कोटी प्रस्तावित करण्यात आली आहे.

**✻धार्मिक पर्यटन-५ मंदिरे** श्री कमलादेवी मंदिर- करमाळा, श्री सिद्धेश्र्वर मंदिर- सोलापूर, श्री शिवपार्वती मंदिर व शिवसृष्टी, अकलूज, श्री नागनाथ मंदीर, वडवळ, ता. मोहोळ आणि श्री सिद्धेश्र्वर मंदिर, माचणुर ता. मंगळवेढा येथे खालील पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे: पिण्याच्या पाण्याची सुविधा, माहिती फलक, स्वच्छतागृह व विश्रांतीगृह, बैठक व्यवस्था, निवारा शेड, पदपथ, पेव्हर ब्लॉक, कचराकूंडी, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन ई. त्यासाठी रक्कम रुपये २५ कोटी प्रस्तावित करण्यात आले आहे.

एकात्मिक पर्यटन प्रकल्पांतर्गत प्रस्तावीत केलेले वरील सर्व बाबींचा पर्यटन धोरण, २०२४ मध्ये उल्लेख असून जिल्हा प्रशासन व जिल्ह्यातील इतर शासकीय संलग्न विभाग (कृषी, MSRLM², M-VIM², सहकार विभाग, जिल्हा परिषद-ग्रामपंचायात विभाग ई.) हे DoT/MTDC च्या सहकार्याने प्रकल्पातील तरतुदींव्यतिरिक्त पर्यटन व पर्यटन पूरक घटकांसाठी पर्यटन धोरणात प्रस्तावीत केलेल्या विविध आर्थिक व बिगर आर्थिक प्रोत्साहनपर बाबींची माहिती स्थानिक इच्छुक व्यावसायिक, उद्योजक, महिलांचे बचतगट, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट तसेच विविध सेवा पुरवठादार इत्यादींपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्यासाठी तसेच त्यांना नियोजित पर्यटन सर्किट मध्ये पर्यटन / पर्यटन पूरक व्यवसाय उभे करण्यासाठी प्रेरित केले जाणार आहे.

✻प्रकल्पाचे फायदे-

या प्रकल्पामुळे सोलापूर जिल्ह्यास खालील फायदे होतील.

एकाच ठिकाणी जल, कृषी व विनयार्ड, धार्मिक पर्यटनाचे अनोखे मिश्रण असल्याने सोलापूर जिल्ह्याकडे पर्यटक मोठ्या प्रमाणात आकर्षित होतील. स्थानिक पातळीवर थेट रोजगार निर्मितीस तसेच स्वयंरोजगार निर्मितीस चालना मिळेल. समूह (cluster) पातळीवर शेती, शेतीपूरक व इतर व्यवसाय (On farm, Off farm, Non farm enterprises) उभारणीसाठी मदत होईल. जिल्यातील विशिष्ट उत्पादनांना (Niche products) उदा: मालदांडी ज्वारी, डाळिंब, सोलापुरी टेरी टॉवेल आणि चादर, शेंगदाणा चटणी, घोंगड्या, बेदाणे, रोस्टेड हुरडा, कडक भाकरी थेट बाजारपेठ उपलब्ध होईल. शहरी पर्यटकांशी ग्रामस्थांचा संपर्क आणि ग्रामीण जीवनशैली, लोककला, संस्कृती ई. प्रसार व संवर्धन होण्यासाठी सहाय्य होईल. जिल्ह्यात विनयार्ड पर्यटनास चालना मिळेल. ग्रामीण भागातील कृषी उत्पादक कंपन्या, महिलांचे बचत गट, उत्पादक गट, झ-उड यांच्यामध्ये देखील व्यावसाईक दृष्टीकोन विकसित होईल व ते खऱ्या अर्थाने विकासाच्या प्रकीयेत सहभागी होतील. (Mainstreaming of CBOs) शेतमालाला शेतातच हक्काचा शाश्र्वत ग्राहक मिळेल. ग्रामीण अर्थव्यवस्था बळकटीकरणासाठी सहाय्य होईल. ग्रामीण भागातून पुणे- मुंबई व इतर शहरांकडे वेगाने होणारे स्थलांतर थांबविण्यासाठी तसेच स्तलांतरित ग्रामस्थांना आपल्या गावाकडे परत आणण्यासाठी या प्रकल्पाची मदत होईल.जिल्ह्यातील पर्यटनाचा चेहरा बदलण्यासाठी उपयुक्त तसेच राष्ट्रीय व जागतिक पर्यटनाच्या नकाशावर सोलापूरची वेगळी ओळख निर्माण होण्यासाठी मदत होणार आहे.

## दहिटणा येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृहाचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

वागदरी/एस.के.गायकवाड : धाराशिव जिल्ह्यातील मौजे दहिटणा ता.तुळजापूर येथील इंदिरा नगर येथे तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील उर्फ राणा दादा यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृहाचे भूमिपूजन करण्यात आले.

दहिटणा येथे झालेल्या विविध विकास कामांचे लोकार्पण व नविन मंजूर करण्यात आलेल्या डॉबाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृहाचे भूमिपूजन समारंभ कार्यक्रमाचे आयोजन येथील ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच शिवकांताताई कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.

प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध व भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करून आमदार राणा दादा यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृहाचे भूमिपूजन करण्यात आले.या प्रसंगी बोलताना राणा दादा म्हणाले की शासनाने सुरू केलेल्या लाडकी बहिण योजनेसंदर्भात वीरोधकांच्या टिकेकडे लक्ष न देता सर्व जाती धर्मातील महिला भगिनींनी या योजनेचा लाभ घ्यावा.तसेच तुळजापूर विधानसभा मतदारसंघात आगामी काळात विकास निधी कमी पडू देणार नाही.तसेच शेतकरी, महिला, युवकांनीही वैयक्तीक पातळीवर च्या योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढे आले पाहिजे.त्यानाही सर्वोतोपरी सहकार्य करण्याचा प्रयत्न केला जाईल.

यावेळी भाजपचे ॲड.दिपक अपुरे,भिवा इंगोले, विवेकानंद मिलगीरे, बिकिशोर धुमाळ, किशोर सुरवसे, रामसिंग परिहार, रिपाइं (आठवले)चे जिल्हा समन्वयक एस.के.गायकवाड, तालुका संघटक सुरेश लोंढे , गुजनूर चे सरपंच फुलचंद वाघमारे, दहिटणा येथील भाजपाचे कल्याण बिराजदार, शंकर चव्हाण, आप्पासाहेब बिराजदार, राजेंद्र नागरसे, नागनाथ कदम, रोहित नांगरे, प्रविण बिराजदार, राहुल गड्डे, दत्ता कुंभार, प्रशांत पाटील, सिध्दराम पाटील, रिपाइंचे सागर सूरवसे, उमेश कांबळे,भरत वाघमारे, परमेश्र्वर कांबळे जेष्ठ कार्यकर्ते सखाराम गायकवाड, उत्तम कांबळे,राम कांबळे, शंकरकांबळे,केरनात वाघमारे,परमेश्र्वर सुरवसे अर्जुन सुरवसे, श्रीशैल कांबळे,वसंत कांबळे ग्रा.प. सदस्य बाबू वाघमारे,संतराम वाघमारे, सोपान कांबळे, उद्धव वाघमारे,भास्कर बनसोडे,संजय बनसोडे उमेश कांबळे,अरविंद वाघमारे,संतोष बनसोडे स्वामीनाथ बनसोडे दिनकर बागडे शहाजी कांबळे,प्रकाश सुरवसे,नागीनीताई सुरवसे सह ग्रामस्थ महिला युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय जनता पार्टी कोल्हापूर च्या अध्यक्षपदी नाथाजी पाटील यांची नियुक्ती

**पत्रकार नामदेव निर्मळे**

भारतीय जनता पार्टीचे एक कट्टर समर्थक व प्रामाणिक नाथाजी तुकाराम पाटील यांची कोल्हापूर पश्र्चिम करवीर जिल्हा अध्यक्ष पदी निवड झाली. यांना निवडीचे पत्र दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बाबनकुळेसो यांनी मुंबई येथील प्रदेश कार्यालयात निवडीचे पत्र दिले प्राप्त झाले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री नाम. देवेंद्रजी फडणविस उच्च व तंत्रशिक्षण मंत्री नाम. चंद्रकांतदादा पाटील यांच्या मान्यतेने व खासदार धनंजय महाडीक , प्रदेश उपाध्यक्ष माजी आमदार सुरेशराव हाळवणकर, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, विभाग संघटनमंत्री मकरंद देशपांडे, समन्वयक राहुल चिकोडे , अलकेश कांदळकर, यांच्या सहकार्याने ही निवड करण्यात आली .गेली २७ वर्षे निष्ठेने पक्षाचे काम केल्याची ही पावतीच म्हणावी लागेल .



## भारतीय जनता पार्टी शिरोळ विधानसभा प्रभारी पदी श्री.रामचंद्र डांगे (तात्या) यांची नियुक्ती



पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री गुरुदत्त शुगर्स कार्यस्थळावर कुरुंदवाड चे माजी नगराध्यक्ष भारतीय जनता पार्टीचे मुलुख मैदानी तोफ रामचंद्र डांगे (तात्या) यांची विधानसभा प्रभारी पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना

श्री गुरुदत्त शुगर्सचे चेअरमन श्री.माधवराव घाटगे दादा,श्री.राहुल दादा घाटगे,शिरोळ तालुकाध्यक्ष श्री.मुकुंद गावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर सत्कार करण्यात आला.यावेळी ,श्री.भरत तमायचे,श्री.आबिदुन मुजावर,श्री.रोहित तवंदकर,श्री.अन्वर जमादार आदी उपस्थित होते.